सोमवार, दि. ९ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३०४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वे

### सीएसएमटी स्थानकावरून सकाळी ६.३० वाजता होणार रवाना; मुख्यमंत्री दाखवणार हिरवा झेंडा

**मुंबई** - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध वारशाचा अनुभव देणारी छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेला उद्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिरवा झेंडा दाखवून रवाना करणार आहेत.




उद्या ९ जून २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) येथून ही रेल्वे रवाना होणार आहे.

IRCTC, रेल्वे मंत्रालय, आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने चालवल्या जाणाऱ्या या विशेष पाच दिवसांच्या सहलीमध्ये राज्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणांचा समावेश आहे. ही रेल्वे रायगड किल्ला, शिवनेरी किल्ला, प्रतापगड किल्ला, पन्हाळा किल्ला, लाल महाल, कसबा गणपती, शिवसृष्टी या ठिकाणांना भेट देणार आहे.

ही यात्रा प्रवाशांना शिवरायांच्या जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांचा आणि त्यांच्या कार्याचा अनुभव देईल. सोयीसुविधा, सांस्कृतिक समृद्धी आणि सहजतेवर भर देणारी ही रेल्वे प्रवाशांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरेल.




**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, जालना शहरात सृष्टी फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ जालना रेनबो यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या प्लास्टिक संकलन व पुनर्वापर केंद्राच्यावतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सिंदखेड राजा रोडवरील वन उद्यान येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. उद्यानातील प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत डॉ. प्रतिभा श्रीपत, संजीवनी देशपांडे, जयश्री कुंजगे, संध्या जहागिरदार, उषा जोशी, सुनीता आष्टीकर, दीपाली कुलकर्णी, अंजली सुरडकर व सुनील जोशी यांनी सहभाग घेतला.**

## आमची प्रक्रिया पारदर्शक आणि उत्तरदायित्वपूर्ण

### भारत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**मुंबई** - भारत निवडणूक आयोगाने काँग्रेस पक्षाला २४ डिसेंबर २०२४ रोजी सविस्तर उत्तर पाठवले असून, त्यात त्यांच्या उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर स्पष्ट आणि तपशीलवार स्पष्टीकरण दिले आहे. या अधिकृत पत्रव्यवहारानंतरही काँग्रेस नेते श्री. राहुल गांधी यांनी माध्यम ंद्वारे पुन्हा शंका आणि आरोप मांडल्याने आयोगाने याबाबत खेद व्यक्त केला आहे.

आयोगाने म्हटले आहे की, निवडणूक आयोग एक स्वतंत्र आणि संविधानिक संस्था आहे. कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा त्याच्या नेत्याने आयोगाशी थेट पत्राद्वारे संपर्क साधल्यास, आम्ही निश्चितच उत्तर देतो आणि देत आलो आहोत.

राहुल गांधी यांनी थेट आयोगाशी संवाद साधण्याऐवजी वारंवार माध्यमांतून आरोप करणे हे आश्चर्यकारक आणि खेदजनक असल्याचे आयोगाचे मत आहे. त्यांनी माध्यमांमध्ये प्रश्न उपस्थित करण्याऐवजी थेट निवडणूक आयोगाशी पत्राद्वारे संपर्क साधावा, अशी अपेक्षा आयोगाने व्यक्त केली आहे.

निवडणूक आयोगाकडे विचारलेल्या अधिकृत प्रश्नांना उत्तर देण्याची आमची प्रक्रिया पारदर्शक आणि ठोस आहे, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

हा संवाद माध्यम ांमधून न करता थेट आयोगाशी केल्यास, लोकशाही प्रक्रियेस अधिक बळकटी मि ळेल आणि संवाद अधिक परिणामकारक ठरेल, असे भारत निवडणूक आयोगाने सांगितले आहे.

## भाजपा जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्ह्याची संकल्प ते सिद्धी उपक्रमाअंतर्गत कार्यशाळा उत्साहात

**जालना । प्रतिनिधी** - पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त संपूर्ण देशभर संकल्प ते सिद्धी अभियान राबवले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पक्षाच्या वतीने रविवार (दि ८) सकाळी १०.०० वाजता भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्ह्याची विशेष जिल्हा कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.



यावेळी माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, जालना म हानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती. या तिघांनीही आपल्या सखोल मार्गदर्शनातून संकल्प ते सिद्धी उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत आगामी काळातील संघटनात्मक काम काजाची दिशा स्पष्ट केली.

कार्यशाळेमध्ये विकसित भारत - अमृत काळातील सेवा, सुशासन व गरीब कल्याण या संकल्पनेवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देत, त्याचा लाभ जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रचार आणि जनसंपर्क यंत्रणा मजबूत करण्याच्या दृष्टिकोनातून नियोजन करण्यात आले. कार्यशाळेत जिल्हा पातळीवर येत्या काळात पत्रकार परिषद, जनजागृती सभा व मेळावे आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी या उपक्रमात आपली जबाबदारी निर्धारीत करत पुढील काळात कार्यरत राहण्याची ग्वाही दिली व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भरघोस यश संपादन करण्याचा संकल्प विषद करून कार्यकर्त्यांना तत्पर व सक्रिय राहण्याचे आवाहन केले.

यावेळी शिवाजीबापू थोटे, बद्रीनाथ पठाडे, सुनील आर्दंड, विमलताई आगलावे, विजय कामड, सोपान पेंढारकर, अनिलराव कोलते, सतीश जाधव, चंपालाल भगत, धनराज काबलिये, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, सखुबाई पणबिसरे, ममता कोंड्याल, वर्षाताई ठाकूर, हिराबाई काळे, सुनील पवार यांच्यासह जिल्ह्यातील नवनियुक्त जिल्हाध्यक्ष, माजी जिल्हाध्यक्ष, मंडळ अध्यक्ष, माजी अध्यक्ष, जिल्हा व मंडळ समिती सदस्य व पदाधिकारी मोठ्या संख्येने या कार्यशाळेत उपस्थित होते.

## राज्यात मुंबई शहर जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस

**मुंबई** - राज्यात मागील २४ तासांमध्ये (८ जून रोजी सकाळपर्यंत) मुंबई शहर जिल्ह्यात सर्वाधिक ४१ मिमी पाऊस झाला आहे. तर रायगड २०.८ मिमी, धाराशिव १३.८ मिमी, ठाणे ७.९ मिमी, रत्नागिरी जिल्ह्यात ६.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. राज्यात कालपासून ८ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिम ीटरमध्ये) : ठाणे ७.९, रायगड ,२०.८, रत्नागिरी ६.७, सिंधुदुर्ग २, पालघर ०.९, नाशिक ३.५, धुळे १.९, नंदुरबार ०.३, जळगाव ०.९, अहिल्यानगर ५.७, पुणे ३.१, सोलापूर ३.८, सातारा ३.५, सांगली २.६, कोल्हापूर ३.१, छत्रपती संभाजीनगर ५, जालना ५.३, बीड १.२, लातूर ४.५, धाराशिव १३.८, नांदेड ०.७, परभणी २.९, हिंगोली ०.५, बुलढाणा ०.८, वाशिम ०.२, यवतमाळ ०.३, वर्धा ०.१. अतिवृष्टी आणि संभाव्य पूर परिस्थिती बाबत उपाययोजना म्हणून एनडीआरएफ, एसडीआरएफ पथकांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

युवा आदर्श

### निवृत्ती योग्य ...

महत्व योग्य वेळेला
जरूर घ्यावी निवृत्ती
मीच मी सदा सर्वदा
संघास घातक प्रवृत्ती
पुस्तका लोकप्रियता
निघते नवीन आवृत्ती
जुने खोड बाजू जाता
नव बिजांची उत्पत्ती
उलाढाल हवीनक्की
वाढवायला रे संपत्ती
जुनाट पाया ढासळत
आणेल महा आपत्ती
विचार पूर्वक निवृत्ती
सस्नेह करा स्विकृती
पहिल्याहून आकर्षक
सादर होई प्रतिकृती
वाहता असावा प्रवाह
व्हावी निर्झर निर्मिती
निरोप जुन्या सन्माने
वेळेला वेळेत संमती
वरिष्ठांनो द्या आशीष
मार्गदर्शक सहमती
तुम्हाहून प्रभावशाली
तयार करा प्रतिकृती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## स्वच्छ भारत, उज्ज्वला, जनधन आणि जीएसटी यांसारख्या योजनांनी देशात परिवर्तन घडविले - आमदार लोणीकर

### जालना जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा भाजपाचाच; आ. लोणीकरांनी व्यक्त केला विश्वास

**जालना । प्रतिनिधी** - भाजपाने गेल्या ११ वर्षांत आर्थिक सुधारणा, पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती आणि सामाजिक कल्याण योजनांद्वारे भारताच्या विकासाला गती दिली आहे. स्वच्छ भारत, उज्ज्वला, जनधन आणि जीएसटी यांसारख्या योजनांनी देशात परिवर्तन घडवले. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सरकारच्या ११ यशस्वी वर्षांच्या कार्यकाळानिमित्त जालना येथील भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात ०८ जून २०२५ रोजी आयोजित संकल्प से सिद्धि तक जिल्हास्तरीय कार्यशाळेत माजी मंत्री आणि परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत त्यांनी संघटन कौशल्य आणि भारतीय जनता पक्षाने देशभरात केलेल्या विकास कामांवर प्रकाश टाकला या वेळी ते बोलत होते. या वेळीआमदार बबनराव लोणीकर यांनी जाहीर केले आहे की भारतीय जनता पक्ष (भाजप) जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकीत पूर्ण ताकदीने लढेल. या विधानातून त्यांनी पक्षाच्या निवडणूक रणनीती आणि जालना जिल्ह्यातील राजकीय सक्रियतेचा आक्रमक दृष्टिकोन दर्शविला आहे. लोणीकर यांच्या या वक्तव्यातून भाजप स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपली पकड मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट होते. पुढे बोलतांना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की जीएसटी २०१७ मध्ये लागू झालेल्या जीएसटीमुळे करप्रणाली सुलभ झाली. करदात्यांची संख्या जवळपास दुप्पट झाली असून, एप्रिल २०२३ मध्ये जीएसटी संकलन १.८७ लाख कोटी रुपये इतके विक्रमी उच्चांक गाठले. मेक इन इंडिया वर बोलताना आम दार लोणीकर म्हणाले २०१४ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाने उत्पादन



क्षेत्राला चालना दिली. ंब्रिश सारख्या कंपन्यांनी भारतात उत्पादन युनिट्स स्थापन केली, ज्यामुळे रोजगार निर्मिती आणि परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळाले. आत्मनिर्भर भारत वर आमदार लोणीकर यांनी मत मांडले की स्वावलंबी भारतासाठी संरक्षण, उत्पादन आणि कृषी-प्रक्रिया क्षेत्रात स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन मिळाले. परकीय गुंतवणूक धोरणे उदार केली गेली, विशेषत संरक्षण आणि रेल्वे क्षेत्रात आर्थिक वाढ झाली. २०१४ मध्ये भारत जगातील १० वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होती, जी २०२३ पर्यंत ५ व्या क्रम ांकावर पोहोचली. जीडीपी वाढीचा दर २०१४-२२ मध्ये सरासरी ७.६% होता, जो यूपीए सरकारच्या ६.७% पेक्षा जास्त आहे. असे आमदार लोणकर यांनी यावेळी नमूद केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जालना जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, भाजपा जालना शहर अध्यक्ष भास्कर दानवे, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष ग्राम ीण बद्रीनाथ पठाडे , सुनील आर्दड, सोपान पेंढारकर, धनु काबलीये, श्रीमती आगलावे, श्रीमती संध्या देठे, श्रीमती शुभांगी देशपांडे, अनिल कोलते, ज्ञानेश्वर शेजूळ, चंपालाल भगत, रमेश भापकर, संभाजी आप्पा वारे, नितीन राठोड, विक्रम उफाड, संजय आटोळे, पुरुषोत्तम उडान, संजय डोंगरे, भगवान म्हात्रे, गजानन नागवे, अमोल धानोरे, महेश निकम, अशोकराव पवार, नारायणराव पवार यांची उपस्थिती होती.

# संपादकीय

## जननायक

आज भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वटपौर्णिमेच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

भारतीय संस्कृतीत प्रत्येक झाडांना आगळेवेगळे स्थान व महत्त्व आहे. त्यात वटवृक्ष म्हणजे मायेची सावली व शांतीचे प्रतीक आहे.वटपौर्णिमेला भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.सावित्री हे भारतीय संस्कृतीत एक ऐतिहासिक पात्र मानले जाते.सावित्री म्हणजे वेद माता गायत्री आणि सरस्वती. वटवृक्ष एक विशालकाय वृक्ष आहे. ज्यामध्ये त्या झाडाची जटा लटकत असतात.यालाच सावित्री देवी मानले जाते.हिंदु पुराणात ब्रम्हा, विष्णू आणि महेश हे वटवृक्षात राहतात असे मानले जाते.या झाडांच्या मुळामध्ये ब्रम्हा, मध्यभागी विष्णू आणि वरच्या भागात शिव आहे.म्हणून या झाडाच्या पुजेला अत्यंत महत्व आहे. कारण वटवृक्षाच्या पुजेने साक्षात ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचे दर्शन होते.त्यामुळे आज आपल्याला अशाच वृक्षांची नितांत गरज आहे.यावरून स्पष्ट होते की वटवृक्ष एक दैवी शक्तीचे प्रतीक आहेच हे आपल्याला पुराण सुध्दा सांगते.परंतू आज मानवाचा व संपूर्ण जीवजंतूच्या कल्याणासाठी व जीवनमरणाचा प्रश्न ऑक्सिजनवर येवुन ठेपला आहे. कारण दिवसेंदिवस पृथ्वीतलावरील ऑक्सीजनचे प्रमाणात कमी-कमी होत आहे.यामुळे मानवासह संपूर्ण जीवजंतूचे जीवन धोकादायक स्थितीत येवून ठेपले आहे. त्यामुळे आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात वृक्षलागवडीला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे.कारण आपण जेवढे वटवृक्ष लावू तेवढीच ऑक्सिजनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होवून मानव,पशुपक्षी व पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीत आल्हाददायक वातावरणात निर्माण होण्यास मोठी मदत होईल. आज आपण लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक झाडात, पानात, फुलात, मुळात, फळात देवी-देवतांचा वास आहे. त्यामुळेच आपण आज या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत व मोकळा श्वास घेऊ शकतो.परंतु वृक्ष तोड किंवा जंगल तोड वेळीच थांबली नाही तर पृथ्वीतलावरील संपूर्ण जीव सृष्टीचा विनाश कोणीही रोखू शकणार नाही हे सुद्धा कटु सत्य आहे. त्यामुळे प्रत्येक सनाला, वाढदिवसाला, लग्न कार्यक्रम या दिवसाला वृक्ष लागवड व्हायलाच हवी.वटपौर्णिमेप्रमाणे ३६५ दिवसांमध्ये जे कोणते सण येतात त्या-त्या सणाला वृक्षारोपण करून आगळावेगळा उपक्रम राबवायला हवा.तुळशी विवाहाच्या दिवशी तुळशीचे सुध्दा वृक्षारोपण व्हायला हवे.असे जर झाले तर देशात दरवर्षी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल व ऑक्सिजनची मात्रा वाढण्यास मोठी मदत होईल. आपण जगात किंवा भारतात जी काही औषधे पहातो ती कोणतीही असो उदाहरणार्थ ऍलोपॅथिक,आर्युवेदिक, होमिओपॅथिक किंवा जडी-बुटी या ज्या औषधी तयार होतात त्या संपूर्ण वनस्पती पासुनच तयार होतात.त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे.सावित्री आणि सत्यवान यांची कथा अनेक पुराणांमध्ये पहायला मिळते.नारद मुनी सावित्रीला सत्यवानशी लग्न न करण्याचा सल्ला देते.कारण सत्यवान यांचे जीवन काही काळापर्यंत मर्यादित असते.परंतु सावित्री नारदमुनीला न जुमानता सत्यवानशी लग्न करते.तीला पतीच्या मृत्यूची तारीख माहीत असते.अशा परिस्थितीत शिल्लक रहालेल्या दिवसात सावित्री कठोर तपश्चर्या करते.परिणामतः आपल्या पतीला मृत्यूच्या खाईतून बाहेर काढते.यामागे वटवृक्षाची लीला असते.कारण वटवृक्षांमध्ये ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचा वास आहे हे सावित्रीला तपश्चर्ये दरम्यान लक्षात आले व सावित्रीच्या मदतीसाठी स्वयंम ब्रम्हा, विष्णू आणि महेश प्रगट होतात व सावित्रीची मनोकामना पूर्ण होते.हे आपल्याला पुराणात सांगीतले आहे.त्याच अनुषंगाने वटपौर्णिमेला वडाच्या झाडाची पूजा करून महिला सुख-समृध्दीची आराधना करतात व वटवृक्षाच्या रूपात विराजमान असलेले ब्रम्हा, विष्णू आणि महेश व सावित्री यांचे साक्षात दर्शन घेऊन महिला स्वतःला धन्य मानतात.परंतु आज वटवृक्षाची गरज आपणासर्वांनाच आहे.कारण सत्यवानाला वाचवीण्यासाठी सावित्रीने वटवृक्षाचा सहारा घेतला व वटवृक्षाने सावित्रीला सत्यवानाला वाचविले सुध्दा.आज आपल्याला देशाच्या १४० कोटी जनतेचे प्राण वाचवायचे आहे. यासाठी आपल्याला सुध्दा वृक्षलागवडीच्या माध्यमातून तपश्चर्या करावीच लागेल.तेव्हाच आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजनची मात्रा मिळण्यास मोठी मदत होईल व आपणा सर्वांना वटवृक्षाच्या रूपात साक्षात ब्रम्हा, विष्णू आणि महेश व सावित्री यांचे दर्शन होईल.भारतीय संस्कृतीतील कोणताही सण असो त्यामागे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक,धार्मिक, आरोग्य विषयक इत्यादींना धरून असतोच.त्यामुळे सर्वांनीच वृक्ष लागवडीकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याची गरज आहे. वटवृक्ष हा मायेचा आधार आहे कारण तो सर्वांना सावली देतो. त्यामुळे वटवृक्ष हे शांतीचे व मांगल्याचे प्रतीक सुध्दा आहे. सध्याच्या परिस्थितीत पृथ्वी,जल,वायु धोकादायक स्थितीमध्ये आहे.त्यांना वाचविण्याची संपूर्ण जबाबदारी मानवाची आहे. कारण मानव हा बुध्दीजीव प्राणी आहे. आज पृथ्वीतलावर जगात जी काही विनाश लीला दिसत आहे त्याला दोषी फक्त मानवच आहे.ही विनाश लीला रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.आज वृक्ष म्हणजे दैवी शक्तीच आहे.वड, आंबा,आवळा, कडुनिंब,उंबर,केळी, आपट्याचे झाड,बेल,पळस,कुड्याची पाने,इत्यादीसह अनेक झाडांच्या पानांचा,फुलांचा व फळांचा पुजेमध्ये वापर करीत असतो. आज स्त्री शक्ती वृक्षांना वाचवीण्यासाठी वृक्षांची पुजा अर्चना करीत आहे.तर मनुष्य दुसरीकडे जंगल तोड करीत आहे याला कुठेही थांबवायला हवे. पर्यावरण रक्षणासाठी १९७३ मध्ये चिपको आंदोलन करण्यात आले यात मोठ्या संख्येने महिलांनी भाग घेवून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड थांबवीली. यामागचा उद्देश म्हणजे झाडांना वाचवीने.या आंदोलनामुळे शेकडो झाडे, हजारो पक्षी व प्राण्यांची निवासस्थाने वाचली. झाडे लावा,झाडे जगवा,निसर्ग सुरक्षित तर आपण सुरक्षित, आपण सुरक्षित तर देश सुरक्षित, देश सुरक्षित तर जग सुरक्षित हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. यामुळे संपूर्ण सृष्टीत प्रफुल्लित होईल.वटपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# वडपौर्णिमा ; वटसावित्रीचे व्रत

वड हा अनेक वर्ष आयुष्य असणारा महावृक्ष म्हणून ओळखला जातो. त्यामुळेच आपण खूप वर्षांपूर्वीचे जुने वडाची झाडे आजही बघत आहोत. दोनशे ते तीनशे वर्ष जुने वटवृक्ष आजही अस्तित्वात आहेत . अक्कलकोट्च्या श्री स्वामी समर्थांच्या मठातील वटवृक्ष हा खूपच जुना असल्याचे सांगितले जाते.



पूर्वीच्या काळी स्त्रिया ३ दिवसांचे व्रत करायच्या मात्र आता पौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया उपवास करुन वडाची पूजा करतात. एक दिवसीय व्रत करतात.

वटपौर्णिमा म्हणजे सात जन्म तोच पती मिळण्यासाठी महिलांनी करायचे व्रत. हे व्रत केल्यावर आपल्या पतीला दीर्घायुष्य मिळते आणि पुढच्या सात जन्मासाठी आपल्याला तोच पती साथीदार मिळतो अशी धारणा आपल्या समाजात मागच्या बराच काळापासून रुढ आहे. हिंदू पंचांगातील ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा म्हणजे वटपौर्णिमा. . या दिवशी वडाच्या वृक्षाला अनन्यसाधारण महत्व आहे. वड हा वृक्ष अनेक वर्ष आयुष्य असणारा भक्कम वृक्ष म्हणून ओळखला जातो.म्हणूनच त्याला आधारवड म्हणतात.

वड पूजनामागे काही शास्त्रीय कारणेही सांगितली जातात. वडाच्या झाडामध्ये ऑक्सिजनचे प्रमाण जास्त असल्याने स्त्रियांनी या झाडाच्या सानिध्यात राहणे चांगले असते. त्यामुळे हे व्रत करणे अतिशय उपयुक्त ठरते. याबरोबरच एकमेकींना वाण दिल्याने आपल्याकडून दान केले जाते असेही म्हणतात. म्हणून या दिवशी सुहासिनी आंब्याचे वाण देतात. वडाचे झाड ज्याप्रमाणे अनेक वर्षांसाठी जगते त्याचप्रमाणे आपला पतीही दिर्घायुषी व्हावा म्हणून त्याला सुताने बांधून ठेवतात. सुहासिनी सौभाग्य अलंकार परिधान करून देवाची प्रार्थना, तुळशी पूजन करून वडाच्या झाडाजवळ एकत्रित येतात आणि पूजन करतात. त्यानंतर गरजू व्यक्तींना, ब्राह्मणांना आपल्या ऐपतीनुसार दान,दक्षिणा देतात.

वटपौर्णिमेची एक पौराणिक कथाही आहे: अनेक वर्षापूर्वी अश्वपती नावाचा राजाच्या आपल्या सावित्री या मुलीला तिचा पती निवडण्याची परवानगी दिली असते. सावित्र अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. त्यावेळी सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा एका अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहीत असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला होता. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला आणि जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.

तिने तीन दिवस उपवास करून व्रत केले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्याबरोबर गेली. लाकडे तोडता तोडता त्याला चक्कर आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने सावित्रीला परत जाण्याची विनंती केली. पण तिने पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासूसासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने तथास्तु म्हटले, मागितल्या वर्षाप्रमाणे त्याला सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात असे म्हटले जाते.हिंदू धर्मात म्हणजेच हिंदू पौराणिक कथानुसार असे मानले जाते कि वटवृक्ष म्हणजेच त्रिमूर्ती होय, तर त्रिमूर्ती म्हणजे कोण ? तर भगवान विष्णू, भगवान ब्रह्मा आणि भगवान शिव यांचे प्रतिक आहे. असे म्हटले जाते कि ब्रह्मा या झाडाच्या मुळाशी वास करतात, मध्य भागी भगवान विष्णू आणि वरच्या बाजूला भगवान शिव हे वास करत असतात. अशा प्रकारे वडाच्या झाडाची पूजा केल्यास तिन्ही देवांचे व्रत केल्याचे पुण्य लाभते.

वटवृक्षाचे आयुष्य जास्त असते. पारंब्यांनी त्यांचा खूप विस्तार झाला असतो, आणि अशा वृक्षाची पूजा करून स्त्रिया मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभुदे धनधान्य व मुले नातू यांनी प्रपंच विस्तारित व संपन्न होउदे. अशी प्रार्थना करतात.

सावित्री ब्रह्मसावित्री सर्वदा प्रियभाषिणी ।
तेन सत्येन मां पाहि दुःख-संसार-सागरात ।
अवियोगो यथा देव सावित्र्या सहीतस्य ते।
अवीयोगो तथास्माकं भूयात जन्मनी जन्मनी ।।
वटमुले स्थितो ब्रम्हा वटमध्ये जनार्दनः।
वटाग्रे तू शिवो देवःसावित्री वटसंश्रीता ।।
अशी प्रार्थना केली जाते.

या व्रताचे महत्व शास्त्रात आणि पुराणातही याचा उल्लेख केला गेला आहे. जसे कि स्कंद पुराण, महाभारत यांच्यात याचा संपूर्ण पणे उल्लेख हा आपल्याला पाहण्यास मिळेल.

वटपौर्णिमा व्रत साजरा करणे हे विवाहित स्त्री तिच्या पति वरचे भक्ती आणि प्रेम प्रकट करते.

वटपौर्णिमाच्या दिवशी उपवासाला काय खायला पाहिजे? याचेही काही नियम आहेत...

वटपौर्णिमा या दिवशी सर्व स्रिया या उपवास करत असतात, याचे कारण तर आपण पाहिले परंतू या दिवशी उपवासाला काय खावे ? हे बहुतेक कमी लोकांना माहित असेल. या दिवशी फक्त स्रिया फक्त फळांचे सेवन हे करत असतात. फळा व्यतिरिक्त काहीच ग्रहण करीत नाही. तसेच गायीचे दूध, दही, तूप, मुळा, आंबा, डाळिंब, मोसंबी, संत्री आणि केळी इत्यादी पदार्थ व्रताच्या वेळी खाण्यासाठी उपयुक्त आहे.केळी या दिवशी जास्त प्रमाणात ग्रहण केली जातात. कारण केळी हि आपण दुधात केळीचे छोटे छोटे पीस बनवून, दुधात थोडी साखर टाकून घेतात.

जेष्ठ महिन्यात आंब्याचा सीजन असतो. त्यामुळे स्त्रिया आंब्याचे रस करून किंवा आंबा कापून हि खाऊ शकतात.

वटपौर्णिमेच्या दिवशी या गोष्टी करू नये याविषयी काही गोष्टी पारंपरिक रीतीने पाळल्या जातात

अनेकदा पाणीही पिऊ नये.क्षार, लवण, मध आणि मांस यांचे सेवन करू नये.आपल्या शरिराला आणि डोक्याला तेल लाऊ नये.विडा खाऊ नये.अंगाला उटी लाऊ नये.

ज्याप्रमाणे ज्या गोष्टींच्या योगाने शारीरिक सामर्थ्य किंवा मनोविकार बळावतील अशा गोष्टी करू नये.या दिवशी राग, लोभ, मोह आणि आळस या गोष्टी करू नये.दिवसा झोपणे या गोष्टी करू नये.

वृक्षाचे संवर्धन व्हावे आणि जतन व्हावे या हेतूने सुद्धा वड पिंपळाच्या वृक्षाची पूजा करण्याची कल्पना आपल्या संस्कृतीत आहे किंवा स्वीकारले आहे या वृक्षाला पवित्र वृक्ष मानले जाते त्यामुळे त्याची सहसा तोड केली जात नाही. म्हणूनच आज-काल शहरी भागात वडाच्या फांद्या तोडून पूजा केली जाते त्याला बराच विरोध केला जात आहे.

आज आपण एकंदरीत समाजातील परिस्थिती बघितली तर अनेक प्रकारे स्त्रियावर अत्याचार, दारु पिऊन स्त्रियांना मारहाण होते. तरीही त्या स्त्रिया आपल्या कुटुंबाच्या मुलाबाळांच्या भल्यासाठी हे व्रत करीत असतात.



वट पौर्णिमा तारीख : १० जून २०२५ रोजी असून..

वट पौर्णिमा तिथी : सकाळी ११:३५ वाजता सुरु होते. व ११जून रोजी दुपारी १:१३ पौर्णिमा तिथी संपते.

**दिलीप देशपांडे. जामनेर जिल्हा जळगाव.**
**मोबा. ८९९९५६६९१७**

# जॉय सामाजिक संस्थेचा वर्धापन दिन आणि राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**मुंबई**- येथील जॉय सामाजिक संस्थेच्या १० वा वर्धापन दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दिनांक ७ जून २००५ रोजी सायंकाळी जोगेश्वरी येथील अस्मिता भवन सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध संस्था, संघटना, व्यक्तींचा मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला. यावेळी विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून जोगेश्वरी भूषण डॉ एम डी वळंजू, कामगार नेते अविनाश दौंड, उच्च न्यायालयाचे वकील जगदीश जायले, समुपदेशक व मार्गदर्शक ऍड रूषीला रिबेलो, जेष्ठ पत्रकार राजेंद्र घरत, कुर्ला भूषण सत्येंद्र सामंत, डॉ महेश अभ्यंकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ वळंजू हे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांनी द्वीप प्रज्वलक करून तसेच योगिता हिरवे यांच्या स्वागत गीताने आणि भूषण मुळे यांच्या शिव गर्जनेने करण्यात आली. प्रास्ताविक जॉयचे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांनी केले तर सूत्रसंचालन नवी मुंबई समन्वयक वैभव पाटील आणि कार्यधाक्षा असूंता डिसोझा यांनी केले. यावेळी जॉयच्या सामाजिक कार्याचा मागोवा घेणाऱ्या विशेषांकाचे प्रकाशनदेखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जॉय संस्थेच्या वतीने अस्मिता शाळेचे संस्थापक दादा पटवर्धन, शिक्षक नेते जनार्दन जंगले आणि जेष्ठ वृत्तपत्रलेखक विश्वनाथ पंडित यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही जॉयच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून समाज विविध क्षेत्रांत असामान्य कामगिरी करणाऱ्या जवळपास दीडशे व्यक्ती संस्थांना आदर्श समाजसेवक, आदर्श पत्रकार, आदर्श शिक्षक, आदर्श संपादक, आदर्श मुख्याध्यापक, आदर्श शाळा, आदर्श माता, आदर्श गृहिणी, आदर्श दिवाळी अंक, आदर्श तिकीट निरीक्षक, आदर्श शाखाप्रमुख इत्यादी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. उपस्थित सर्वच मान्यवर प्रमुख पाहुण्यांनी जॉय सामाजिक संस्था करत असलेल्या कार्याचे कौतुक करत प्रामाणिक व शुद्ध हेतूने समाजातील वंचित, गरीब व गरजू घटकांना सभासदांच्या वर्गणीद्वारे आवश्यक सहकार्य करणाऱ्या जॉय सारख्या संस्थांची समाजाला गरज असल्याचे मत व्यक्त केले. जवळपास दोन तास चाललेला हा जॉय चा हा वर्धापनदिन व पुरस्कार वितरण सोहळ्याचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जॉयचे पदाधिकारी व सभासद असूंता डिसोझा, वैभव पाटील, भूषण मुळे, चंद्रशेखर सावंत, शीला येरागी, छाया राणे, श्रद्धा कारके, योगिता हिरवे, मीना भूतकर, दत्ता रातवडकर, रोशनी ठोकळे, सृष्टी मुळे, विजय फणसेकर यांनी अथक परिश्रम घेतले. हा नयनरम्य सोहळा यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवर, जॉयचे पदाधिकारी, सभासद, देणगीदार, उपस्थित पुरस्कार्थी आणि पत्रकार बांधवांचे जॉयचे अध्यक्ष गणेश हिरवे यांनी आभार मानले.



# श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापूराण कथेस सूरुवात





**चाकरवाडी । प्रतिनिधी -** विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्यात प. पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस प्रचंड जनसमुदायांच्या उपस्थित.

माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह.भ.प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर व ह.भ.प. नारायण महाराज भाऊ यांच्या हस्ते शिवमहापुराण ग्रंथ पूजन करण्यात आले

मंत्री पंकजाताई मुंडे यांनी चाकरवाडी येथे प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली व शिवमहापुराण कथेस आलेल्या भाविक भक्तांचे चाकरवाडी येथे स्वागत केले.

तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी शिवमहापुराण कथेस व माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास आलेल्या भाविक भक्तांना आशिर्वाद दिले. सर्वांनी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात नामस्मरण, अभंग संकीर्तन,शिवमहापुराण कथेचा लाभ घ्यावा असे महादेव महाराज तात्या यांनी आव्हान केले .सद्गुरु संत ज्ञानेश्वर माऊली दादाच्या जय जय घोष व हर हर महादेव जय घोषणे आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवमहापुराण कथेस सुरुवात झाली. महाराष्ट्रातील भक्तीच माहेरघर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस सुरुवात झाली पहिल्याच दिवशी भाविक भक्तांचा महापूर चाकरवाडी येथे आला , सुमारे ३ लाख पेक्षा अधिक जनसागर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस उपस्थित होते . संत महंतांच्या उपस्थितीत शिवमहापुराण कथेस तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प. पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा सुरू झाली पुढील सात दिवस शिव महापुराण कथा सुरू राहणार आहे भाविक भक्तांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले.

## आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नातून रस्ते व पुल बांधकाम आणि रस्ते सुधारणा प्रकल्पांना गती

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार आणि महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून मतदारसंघातील रस्ते सुधारणा आणि पुल बांधकामासाठी एकूण ३० कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. या निधीमुळे परतूर तालुक्यातील वाटूर ते लावणी, पोखरी पाटी ते त्रिफुली आणि जयपूर ते बेलोरा या रस्त्यांचे खडीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण तसेच रुंदीकरण (३.७५ मीटरवरून ५.५० मीटर) होणार आहे. याशिवाय, लावणी ते पळसखेडा रस्त्याची सुधारणा आणि वाटूर-जयपूर रस्त्यावरील पुलाचे बांधकामही या निधीतून पूर्ण होईल.

यात वाटूर ते लावणी (७ किमी) खडीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण आणि साईड पंखे मुरमाने भरण्यासाठी १२ कोटी ५० लाख रुपये, पोखरी पाटी ते त्रिफुली आणि जयपूर ते बेलोरा (७ किमी) खडीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण आणि रुंदीकरणासाठी १२ कोटी ५० लाख रुपये., लावणी ते पळसखेडा रस्ता सुधारणा २ कोटी ५० लाख रुपये., वाटूर-जयपूर रस्त्यावरील पुल बांधकाम:** २ कोटी ६५ लाख रुपये. या कामांचा समावेश आहे.

या प्रकल्पांसाठी निधी मंजूर करवून घेण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळे हा निधी उपलब्ध झाला असून, परतूर मतदारसंघातील दळणवळण सुविधा सुधारण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

या रस्त्यांच्या कामांचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. मात्र गुत्तेदार नळगे, खालापुरे, कुलकर्णी आणि देशमुख यांनी कामात टाळाटाळ केल्याने काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. याबाबत दिनांक ०८ जून २०२५ रोजी रविवारी सकाळी आमदार बबनराव लोणीकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना आणि गुत्तेदारांना आक्रमकपणे खडसावत कामाला गती देण्याचे निर्देश दिले. परिणामी, गुत्तेदारांनी कामाचा वेग वाढवला असून, लवकरच हे प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता आहे.



या रस्त्यांच्या सुधारणेमुळे परतूर तालुक्यातील वाहतूक सुलभ होणार असून, गावागावातील नागरिकांना प्रवासात येणाऱ्या अडचणी कमी होतील. स्थानिक नागरिकांनी या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले असून, आमदार बबनराव लोणीकर यांचे विशेष आभार मानले आहेत. आमच्या भागातील रस्त्यांची दुरवस्था संपणार आहे. आमदार लोणीकर यांच्या प्रयत्नांमुळे आम्हाला चांगले रस्ते आणि पायाभूत सुविधा मिळत आहेत, असे एका स्थानिक नागरिकाने सांगितले.

परतूर मतदारसंघातील प्रत्येक गावाला चांगल्या दळणवळण सुविधांनी जोडणे हे माझे प्राधान्य आहे. या रस्त्यांच्या सुधारणेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मी आभार मानतो, असे आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले.

आमदार लोणीकर यांनी यापुढेही मतदारसंघातील इतर रस्ते आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी आणण्याचा आपला प्रयत्न सुरू राहील, असे आश्वासन दिले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर परतूर तालुक्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम आणि सुरक्षित होईल, याची खात्री त्यांनी व्यक्त केली.

## ऊसतोड मजुर; २३४ कुटुंबियांचे स्थलांतर रोखण्यात यश



**परतूर प्रतिनिधी -** गेल्या वर्षाभरा पासुन २३४ कुटुब स्थलंतर थाबविण्यात यश कधी दुष्काळ कधी हाताला काम नाही या समस्या जालना जिल्हातील परतुर तालुका येथील १५, गावे. घनसावंगी तालुका येथील १५,गावे.या गावातील मजुर दरवर्षी उसतोडी साठी कर्नाटक, सोलापुर, सातारा, बारामती, ठिकाणी ऊसतोडी साठी आपल्या कुटुंब लहान बालकां सह जात होते यात त्यांच्या आरोग्य, पोषण, बालकांचे शिक्षण, याकडे दुर्लक्ष होत होते. म्हणून मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर यांच्या वातीने ऊसतोड कामगारांना आरोग्य व पोषण खात्रीशीर सेवा प्रकल्प या माध्यमातुन ऊसतोड कामगारांसाठी पर्यायी उपजीविकेचे अनेक मार्ग आहेत. संस्थेच्या वतीने त्याना पशुपालन शेळी, कोंबडी, किराणा, स्टोअर्स,चे वाटप करण्यात आले आहेत.व स्वतःच्या शेतात फळबाग सुरू करणे कौशल्य अधारित कामे उदा. बांधकाम इलेक्ट्रिक, लघु, उद्योग सुरूवात करणे या सारख्या पर्यायाचा समावेश आहे. तसेच त्याना छोट्या मोठ्या व्यवसाया साठी मदत करूण कौशल्य प्रशिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून गाव पातळीवर ऊसतोड कामगार समिती व गाव बाल संरक्षण समिती. संरपच यांच्या मध्यामातुन लाभार्थी निवड ही गाव पातळीवर ऊसतोड कामगार समिती ठराव घेऊन निवड करण्यात येते व त्यांना शेळी पालन कुक्कुट पालन किराणा दुकान साठी मदत केली जाते उसतोड कामगार हे गावातराहुन लघु व्यवसाय करावे व स्थलंतर थाबावे या हेतुने संस्थेच्या वतीने मदत करूण नियमित प्रशिक्षण भेट घेण्यात येतआहे. यावेळी कार्यक्राच्या अध्यक्ष स्थानी मा. अप्पासाहेब उगले.प्रकल्प संचालक, मा. भाउसाहेब गुजाळ. जिल्हा लाईन समन्वयक जालना, एकनाथ राउत. जिल्हा समन्वयक जालना, माहेरजवळा लमाणवाडी संरपच, सुधाकर भोसले. सीताराम राठोड .गोरख प्रधान. संजय राठोड. रमेश राठोड. आणि संकन पुरी चे छाया कोरडे. रघुनाथ टेकाळे. डॉ प्रभाकर पवार. ग्रामपंचायत सदस्य,गणेश प्रधान.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, राजेश वाघमारे. सुरैखा वाघमारे. अजय गाढे .योगेश आढे .आकाश चैगुले. महादेव खरात. यांनी मेहनत घेतली.

## ग्रामपंचायत चितळी पुतळी ठरली घरकुल साठी पाच ब्रास वाळू देणारी जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत

### जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वाळूच्या मोफत पासचे वाटप

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाने घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेला जालना जिल्हातील ग्रामपंचायत चितळी पुतळी येथे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, यांच्या हस्ते व उपविभागीय अधिकारी शशिकांत हदगल, तहसीलदार छाया पवार मॅडम, गावाच्या प्रथम नागरिक सरपंच स्वप्ना राजेंद्र वांजुळे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रम योजनेचा जिल्ह्यातील



पहिली ग्रामपंचायत म्हणून चितळी पुतळी येथे प्रारंभ झाला.

राज्यात घरकुल प्रधानमंत्री घरकुल, रमाई माता, शबरी माता घरकुल योजना राबवली जात आहे. या योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते प्राप्त झाले आहे. लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी व योजना अधिक बळकट करण्यासाठी सरकारने लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याचे ठरवले आहे. त्यानुसार जालना तालुक्यात चितळी पुतळी येथून गुरुवारी या योजनेला प्रारंभ झाला. यावेळी जिल्हाधिकारी महोदय यांच्या उपस्थितीत राशन कार्ड वाटप दिव्यांग म्हणून अन्नपूर्णाबाई करणे तर अनुसूचित जमाती अंत्योदय मधून यशोदाबाई हटकर ग्री स्टॅक या योजनेच्या माध्यमातून किसान कार्ड गावातील ८५ टक्के शेतकरी बांधवांनी या योजनेत लाभ घेतला असून मन्मथ सर्जेराव गादगे या शेतकरला प्राथमिक स्वरूपात कार्डचे वाटप करण्यात आलं तर शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी विविध दाखल्यांचं जिल्हाधिकारी महोदयांच्या यांच्या हस्ते दाखला आपल्या दारी या उपक्रमाच्या माध्यमातून काही दाखल्यांचेही प्राथमिक स्वरूपात वाटप करण्यात आलं

सरपंच मोदींनी विविध क्षेत्रात उल्लेखनी केलेल्या कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी महोदय यांच्या हस्ते सरपंच सौ स्वप्न राजेंद्र वांजळे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला तर विरेगाव सज्जा अंतर्गत सर्व क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल श्री हजारे साहेब यांचा तर तलाठी दहिवाळ सर यांचा यावेळी जिल्हाधिकारी महोदय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी महोदयांनी आपलं मनोगत व्यक्त करत असताना या सर्व योजनेबद्दल अत्यभूत माहिती व योजना यशस्वी राबवाव्या अशा सूचना गावकऱ्यांचा शेतकरी बांधवांना देण्यात आल्या

यावेळी उपविभागीय अधिकारी शशिकांत अधिकारी यांनी मनोगत व्यक्त केले सरपंच यांनी प्रास्ताविकाच्या माध्यमातून गावाच्या समस्येवर लक्ष वेधले यावेळी पर्यावरण दिनाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी महोदय श्रीकृष्ण पांचाळ साहेब उपविभागीय अधिकारी शशिकांत हदगल, तहसीलदार छाया पवार मॅडम, गावाच्या प्रथम नागरिक सरपंच स्वप्ना राजेंद्र वांजुळे यांच्या हस्ते सिद्धेश्वर महादेव मंदिर संस्थान परिसरात वृक्ष लागवड करण्यात आल. यावेळी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी तलाठी ग्रामसेवक सह प्रशासनातील विविध पदाधिकारी व गावकरी महिला बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## नळविहिरा येथे 'ग्रोव्हिजन' आयोजित 'कृविकें'चे सघन कापूस लागवड चर्चासत्र संपन्न



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील नळविहिरा येथे हनुमान मंदिरावर आज ( ५ जून ) गुरुवार रोजी ग्रोव्हिजन गटशेती संघ व नल ग्रोव्हिजन फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड यांच्या वतीने आयोजित शासकीय अनुदानास पात्र अशा विशेष कापूस प्रकल्प २०२५ - २०२६ योजनेतून सघन व दादा लाड कापूस लागवड तंत्रज्ञान बाबत शेतकरी मार्गदर्शन व चर्चासत्र संपन्न झाले.

बदनापूरच्या कृषी विज्ञान केंद्रातील श्री. अजित डाके यांनी या विशेष कापूस योजना प्रकल्पबाबत शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. बियाणे, लागवडीचे अंतर, छाटणी किंवा वाढरोधक तंत्रज्ञान, खताच्या मात्रा, मिळणारे शासकीय अनुदान व एकूण मिळणाऱ्या नफ्याची त्यांनी गोळाबेरीज सांगून हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी कसे फायद्याचे आहे हे उपस्थित शेतकऱ्यांना पटवून दिले.

ग्रोव्हिजन गटशेती संघ व नल ग्रोव्हिजन फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संस्थापक प्रमुख संजय मोरे यांनी कापूस पिकासह गटाने सोयाबीन पिकाचा पेरा केल्यास मिळणारे फायदे सांगून उपस्थितांचे आभार मानले. यावेळी सर्वश्री रावसाहेब गाडेकर, विष्णू मोरे, ज्ञानेश्वर गाडेकर, आनंता लोखंडे, सूर्यभान गाडेकर, राजेंद्र क्षीरसागर, गुलाबराव म्हस्के, दिनेश गायकवाड, आंबादास गाडेकर, गजानन दानवे यासह शेतकरी उपस्थित होते.

## एक पेड माँ के नाम अभियानचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ



**जालना । प्रतिनिधी -** पंतप्रधान, महाराष्ट्र शासन व सहकार खात्याच्या आवाहनाला अनुसरून रेणुकादेवी नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या एक पेड माँ के नाम या अभियानाचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याहस्ते वृक्ष लागवडीने करण्यात आला.

रेणुकादेवी नागरी सहकारी पतसंस्थेने एक पेड माँ के नाम या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून पारशी टेकडी या ठिकाणी जागतिक पर्यावरणदिन दिनानिमित्त ५० वृक्षांची लागवड केली. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमामुळे निश्चितच जन्मदात्या आईची आठवण या वृक्षारोपणातून होणार आहे.आई आपल्या लेकरासाठी कष्ट घेते व त्याचे भरण-पोषण करते, तसे त्या वृक्षातील आईसुद्धा येणाऱ्या- जाणाऱ्यांना सावली, शुद्ध ऑक्सिजन व फळे देईल. झाडे लावून थांबू नका तर त्याचे संवर्धन करा आणि या वृक्षामध्ये आपल्या आईला बघा. तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या संतोक्तीनुसार या झाडाचे संवर्धन करावे , असे आवाहन त्यांनी यानिमित्ताने केले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ विठ्ठल पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र घोगरे, व्यवस्थापक राहुल शाहिवाले, ओमप्रकाश चाटे, दीपक खरवणे, दीपक मराठे, बाबासाहेब क्षीरसागर, अनिल बिल्ला, श्रीकांत संदुपाटला, मंगेश कामे, गणेश चुंबळे, महेश जिगे, निखिल गवते, गजानन जोशी, संदिपान देवडकर, एकनाथ चव्हाण, हनुमान मोरे, जयंतराव पुरी व कर्मचारी उपस्थित होते.







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.